<u>कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश</u>

महाराष्ट्र शासन

क्रमांक: नप्राशा-२५०५/(१०२/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :१६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त (मराठी व इतर माध्यमाच्या) खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३२३ (तीनशे तेवीस ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी ). सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) <u>कायम विना अनुदान तत्वावर</u> व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास " जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : पीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करून ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.पीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या

अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०९०६००१ असा आहे.

(भि.य. मंता)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४८ | तिर्थरुप शिक्षण सेवा संस्था, ३३ शांतीनाथ हौ.सो.शिवनगर शहानुरवाडी औरंगाबाद | ३३ शांतीनाथ हौ.सो.शिवनगर गाधिया विहार रोड शहानूरवाडी औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ४९ | ओम शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळ १७,सहकार बँक कॉलनी दर्गा रोड, औरंगाबाद | सहकारबँक कॉलनी,शहानूरवाडी परिसर औरंगाबाद. | मराठी | १ ली |
| ५० | अश्वमेघ एज्युकेशन अँड व्यायाम प्रसारक मंडळ,जिम्नॅशियन बिल्डींग,सिडको एन-१औरंगाबाद | रेणुका माता मंदीर शेजारी सातारा परिसर औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५१ | शिवछत्रपती शंभूराजे शिक्षण संस्था औरंगाबाद | प्राथमिक विद्यामंदीर सातारा परिसर औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५२ | विजयलक्ष्मी बहुउद्देशिय प्रतिष्ठान स्वातंत्र्य सैनिक कॉलनी औरंगपुरा औरंगाबाद | नागेश्वरवाडी औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५३ | आनंद आश्रम नक्षत्रवाडी औरंगाबाद | आनंद विद्याधाम आनंद आश्रम नक्षत्रवाडी औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५४ | ओम शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळ १७,सहकार बँक कॉलनी दर्गा रोड, औरंगाबाद | शिवराई ता.गंगापूर जि.औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५५ | गोरक्ष शिक्षण संस्था पाडळी,ता.जि.बुलढाणा | खामगांव ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५६ | कै.बापूसाहेब शुक्ल शिक्षण प्रसारक मंडळ, १ शिवनंदन अपार्टमेंट, १ छत्रपती नगर गारखेडा परिसर औरंगबाद. | स्वप्न नगरी गारखेडा औरंगाबाद | मराठी | १ ली |
| ५७ | सलाम एज्युकेशन ॲण्ड ऑदर वेल्फेअर सोसायटी, अनवरी हाऊस, अजीजपुरा,बीड | हिनानगर, टाईम्स कॉलनी,औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ५८ | सलाम एज्युकेन ॲण्ड ऑदर वेलफेअर सोसायटी, अनवरी हाऊस,अजीजपूरा,बीड | नेहरुनगर, औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ५९ | रोजाबाग एज्युकेशन सोसायटी,औरंगाबाद | क्रिसेन्ट हौ.सो., एन-१३ व एन-१२, रोजाबाग, हिमायतबाग,औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ६० | महाराष्ट्र कलाभारती शिक्षण व वैद्यकीय सेवा मंडळ,औरंगाबाद | नारेगांव,औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ६१ | मदरसा-इ-अरेबीया काशिफ उल उल्लूम,औरंगाबाद | बुढीलेन,औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ६२ | नॅशनल मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद | टाऊन हॉल,औरंगाबाद | उर्दू | १ ली |
| ६३ | लोकसंख्या नियंत्रण आणि संवर्धन सेवाभावी संस्था, सिल्क मिल कॉलनी, औरंगाबाद | लाडसावंगी, ता.जि.औरंगाबाद | उर्दू | १ ली |